**स्थायी निदेश क्र. ११**

क्र.आयएनएस १०-०१/प्र.क्र.१८३/६
नगरपरिषद प्रशासन संचालनालय,
गृहनिर्माण भवन (म्हाडा) तळमजला,
वांद्रे (पूर्व) मुंबई- ४०० ०५१.
दिनांक २८ मार्च २००१.

विषय : नगरपरिषदा आणि नगरपरिषद प्रशासन संचालनालयाच्या अधिनस्थ कार्यालयाची वार्षिक प्रशासकीय तपासणी

सद्यस्थिती

राज्यातील नगरपरिषदांमध्ये आणि नगरपरिषद प्रशासन संचालनालयाच्या अधिनस्थ असलेल्या कार्यालयांमध्ये दैनंदिन कामकाज कशाप्रकारे होत आहे यांच्यावर प्रत्येक वरिष्ठ पातळीवरुन नियमित पर्यवेक्षण ठेवणे आणि योग्य प्रकारे संनियंत्रण करणे आवश्यक आहे. संचालक, नगरपरिषद प्रशासन, प्रादेशिक संचालक नगरपरिषद प्रशासन आणि जिल्हाधिकारी यांच्या मार्फत नगरपरिषदांच्या कामकाजाची वार्षिक प्रशासकीय तपासणीची पध्दती पर्यवेक्षणाचा एक भाग म्हणून सध्या अंमलात आहे. परंतु नगरपरिषदांच्या सध्याच्या कामकाजावरुन आणि ज्या पध्दतीने वार्षिक तपासणी केली जात आहे तिच्या आढाव्यावरुन खालील निष्कर्ष पुढे आले आहेत

१) प्रत्येक नगरपरिषदेची वार्षिक तपासणी दरवर्षी केली जात नाही.

२) नगरपरिषदांची तपासणी करण्याकरिता पर्यवेक्षीय कार्यालयांकडून नियमितपणे वेळेवर तपासणी कार्यक्रम आखला जात नाही आणि नगरपरिषदांना कळविला जात नाही.

३) नगरपरिषदांची वार्षिक तपासणी कामकाजाच्या सर्व विषयांवर केली जात नाही, काही ठराविक बाबींचाच तपासणीमध्ये उल्लेख केला जातो.

४) तपासणी अहवालातील परिच्छेदाच्या पुर्ततेकरिता नगरपरिषदांकडून तसेच तपासणी करणा-या वरिष्ठ प्राधिका-याकडून कटाक्षाने लक्ष दिले जात नाही.

५) यापूर्वी झालेल्या तपासणी अहवालातील पुर्ततेकरिता प्रलंबित परिच्छेदांची संख्या फार मोठी आहे.

६) प्रादेशिक संचालक नगरपरिषद प्रशासन आणि जिल्हाधिकारी कार्यालयातील नगरपरिषद शाखेची तपासणी संचालनयाकडून केली जात नाही.

७) एकंदरीत तपासणी कार्यक्रम योग्यप्रकारे दरवर्षी राबविला जात नाही म्हणून तपासणीच्या माध्यमातून जे उद्देश साध्य करणे अपेक्षित आहे ते साध्य होत नाहीत.

प्रकाशासकीय तपासणीचे उद्देश

०२. नगरपरिषदांच्या कामाची तपासणीबद्दल वरील वस्तुस्थिती विचारात घेता अलिकडे या कार्यालयाकडून काही निदेश व सूचना देण्यात आलेल्या आहेत, त्याशिवाय पुढीलप्रमाणे या विषयावर स्थायी निदेश देण्यात येत आहेत:

१) वरिष्ठ प्राधिका-यांच्या प्रशासकीय पर्यवेक्षण आणि सनियंत्रणाचा एक महत्व पूर्ण भाग म्हणून नगरपरिषदा व इतर दुय्यम कार्यालयांच्या प्रशासकीय तपासणीमार्फत खालील उद्देश साध्य करता येतात.

अ) तपासणी केल्यावरुन तपासणी होत असलेल्या कार्यालयामध्ये किंवा संस्थेमध्ये कामकाजाची सद्यस्थिती काय आहे याचा नक्की अंदाज समोर येणे.

ब) कामकजाची सद्यस्थिती समोर अल्यावर त्या कार्यालयामध्ये काम करणारे अधिकारी आणि कर्मचारी यांना आपल्या कामकाजाच्या पध्दतीबद्दल आत्मनिरीक्षण करण्याची संधी प्राप्त होणे आणि अशा आत्मनिरीक्षणा अंती स्वतःच्या कार्यपध्दतीमध्ये सुधारणा करण्यास त्यांना उद्युक्त करणे.

क) तपासणी आढळून आलेल्या चुका, त्रुटी अनियमितता इत्यांदीची संबंधितांना जाणीव करुन देणे व त्यांची पुर्नरावतृत्ती टाळण्यासाठी उपाययोजना करण्याची संधी मिळवून देणे.

ड) कार्यपध्दतीमध्ये किंवा इतर प्रकारे झालेल्या विशिष्ट कामगिरीची नोंद घेणे आणि अशी विशिष्ट कामगिरी करणा-यांना प्रोत्साहित करणे, आणि अशा उत्तम कामगिरीची इतर अधिकारी व कर्मचारी यांच्यामध्ये देवाणघेवाण घडवून आणणे,

इ) तपासणीमध्ये आढळून आलेल्या गंभीर त्रुटी, गैरप्रकार, अनियमितता इत्यांदीवर आळा बसविण्यासाठी संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन त्यांच्याविरुध्द् आवश्यक ती शासन कारवाई करणे, आणि

ई) वरिष्ठ प्राधिका-याकडून दुय्यम कार्यालयांना कामकाजाबद्दल मार्गदर्शन करणे.

०३. तपासणीचे वर नमूद केलेले उद्देश सर्व नगरपरिषदा आणि नगरपरिषद प्रशासन संचालनालयाच्या अधिनस्थ असलेल्या कार्यालयांतील प्रत्येक अधिकारी आणि कर्मचारी यांनी योग्यप्रकारे समजून घेणे आवश्यक आहे. या उद्देश्यांची ख-या अर्थाने प्रत्यक्षात पूर्तता व्हावी याकरिता प्रत्येक नगरपरिषद आणि या संचालनालयाच्या अधिनस्थ कार्यालयाची दरवर्षी प्रशासकीय तपासणी करणे अनिवार्य आहे. म्हणून याची सर्व प्रादेशिक संचालक आणि जिल्हाधिकारी यांनी नोंद घ्यावी, अशी विनंती आहे.

## तपासणीचे प्रकार

०४. कार्यालयाच्या कामकाजावर पर्यवेक्षण ठेवता यावे आणि योग्य प्रकारे कामावर संनियंत्रण व्हावे याकरिता सर्वसाधारणपणे तपासणीचे तीन प्रकार आहेत --

१) पूर्वनियोजित कार्यक्रमानुसार सखोल तपासणी.

२) विशिष्ट परिस्थितीत अचानक हाती घेतली जाणारी तपासणी.

३) नगरपरिषदा किंवा अधिनस्थ कार्यालयांना वरीष्ठ प्राधिका-यामार्फत दिल्या जाणा-या भेटी.

०५. संचालक, प्रादेशिक संचालक (सर्व) आणि जिल्हाधिकारी (सर्व) यांच्यामार्फत नगरपरिषदांची यापुढे दरवर्षी या तिन्ही प्रकारची तपासणी हाती घ्यावयाची आहे.

## तपासणीकरिता कामकजाचे विषय

०६. नगरपरिषदांची वार्षिक तपासणी करताना कोण कोणते विषय घेतले जावेत याकरिता संचालनालयाकडील स्थायी निदेश क्र. १, दि. १४.०८.२००० अन्वये सुधारीत प्रपत्रांचा संच तयार करुन उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. त्या प्रपत्र संचामध्ये आणखी काही विषयांचा समावेश करुन वेळोवेळी सुधारणा केली जाईल आणि आपणास त्याप्रमाणे कळविले जाईल. मात्र प्रशासकीय तपासणीत या संचातील सर्व विषयांचा समावेश राहील.

०७. तपासणी करताना अपेक्षा अशी आहे की, नगरपरिषदाच्या एकंदरीत कामकाजामध्ये येणारे सर्व महत्वाचे विषय तपासणीकरिता घेतले जावेत. प्रामुख्याने कामकाजाच्या बाबी बद्दल कायदा, नियम व इतर वैधानिक निदेशांमध्ये ज्या तरतदुी असतील त्याप्रमाणेच कामकाज होते किंवा नाही यादृष्टीने कामकाजाची मिमांसा केली जावी. नगरपरिषदांच्या कामाचा कोणातही महत्वाचा विषय तपासणी करताना वगळला जावू नये, याची दक्षता घेणे जरुरीचे आहे. थोडक्यात वर नमूद केलेले सर्व उद्देश साध्य करण्याकरिता ज्या ज्या बाबींकडे प्रामुख्याने लक्ष देणे आवश्यक आहे, त्या सर्व बाबींबद्दल तपासणी केली जावी.

## तपासणी प्राधिका-यांकडून दरवर्षी नगरपरिषदांची अदलाबदलीने तपासणी

०८. संचालक, प्रादेशक संचालक आणि जिल्हाधिकारी (नगरपरिषदांची तपासणी करण्याकरीता जिल्हाधिकारी आपल्या हाता खालील ज्या उपविभागीय अधिका-यांना प्राधिकृत करतील त्यांच्यासह) यांनी वार्षिक तपासणीकरिता दरवर्षी तीच तीच नगरपरिषद घेवू नये. एकाच नगरपरिषदांची पूर्वनियोजित तपासणी एका पेक्षा अधिक प्राधिका-याने एका वर्षामध्ये करु नये. मात्र अचानक तपासणी व भेटी बद्दल असे बंधन राहणार नाही. पूर्वनियोजित तपासणीचा कार्यक्रम वर्षाच्या सुरुवातीलाच आखावा व नगरपरिषदांना कळवावा. तपासणी कार्यक्रम अशाप्रकारे हाती घेतला जावा की दरवर्षी प्रत्येक नगरपरिषदेची तपासणी एका प्राधिका-याकडून जरुर केली जाईल.

**वार्षिक तपासणीचे मानके**

०९. संचालक, प्रादेशिक संचालक आणि जिल्हाधिकारी यांच्यामार्फत नगरपरिषदांची वार्षिक तपासणी खालीलप्रमाणे केली जावी.

| तपासणी प्राधिकारी | पूर्व नियोजित तपासणीचे उद्दिष्ट |
|---|---|
| १) संचालक, नगरपरिषद प्रशासन | किमान १२ नगरपरिषदा ३ प्रादेशिक संचालकांची कार्यालये व ३ जिल्हाधिकारी कार्यालय (नगरपरिषद शाखा) |
| २) प्रादेशिक संचालक नगरपरिषदा | प्रत्येकी किमान १२ नगरपरिषदा |
| ३) जिल्हाधिकारी | त्यांच्या जिल्हयातील उर्वरित नगरपरिषदा |

| तपासणी प्राधिकारी | अचानक तपासणी उद्दिष्टे |
|---|---|
| १) संचालक नगरपरिषद प्रशासन | किमान २ नगपरिषदा. |
| २) प्रादेशिक संचालकन गरपरिषद प्रशासन | प्रत्येकी किमान २ नगरपरिषदा |
| ३) जिल्हाधिकारी | संचालक व प्रादेशिक संचालक यांच्याकडून तपासल्या जाणा-या नगरपरिषद वगळून उर्वरित नगरपरिषदा पैकी निवडणे. |

१०. याशिवाय प्रादेशिक संचालक आणि जिल्हाधिकारी यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील काही नगरपरिषदांना आपल्या सवडीप्रमाणे भेटी द्याव्यात. अशा भेटीच्या वेळी महत्वाच्या प्रमुख विषयांचा आढावा घ्यावा आणि नगरपरिषदांच्या कामकाजामध्ये गंभीर स्वरुपाच्या अनियमितता किंवा गैरप्रकार होत नसल्याबद्दलची खात्री करुन घ्यावी.

**तपासणी कार्यक्रम कळविणे**

११. संचालक, प्रादेशिक संचालक आणि जिल्हाधिकारी यांनी आर्थिक वर्षात कोणं कोणत्या नगरपरिषदांची पूर्व नियोजित तपासणी करावयाची आहे याचा कार्यक्रम एप्रिल महिन्याच्याअखरे पर्यंत संबंधित नगरपरिषदांना कळविला पाहिजे. पूर्व नियोजित तपासणीचा हा कार्यक्रम संचालक, प्रादेशिक संचालक आणि जिल्हाधिकारी कार्यालयाकडून क्रमशः संचालक, नगररचना कार्यालय, पुणे संबंधित प्रादेशिक उपसंचालक, नगररचना आणि सहायक संचाक, नगरररचना यांना तसेच मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा व संबंधित उपमुख्य लेखा परीक्षक स्थानिक निधी लेखा यांना सुध्दा कळविला पाहिजे. तसचे वार्षिक तपासणी अहवालाची एक प्रत मुख्य लेखा परीक्षक स्थानिक निधी लेखा व संबंधित उपमुख्य लेखा परीक्षक स्थानिक निधी लेखा यांना ही पाठवावी. अशा तपासणी अहवालातील तपासणी पथकाचे अभिप्राय लेखा परीक्षकांनी लेखापरीक्षणाच्या वेळी विचारात घ्यावेत.

**पूर्व नियोजित वार्षिक तपासणीकरिता नगरपरिषदांनी प्रपत्र संच तयार ठेवणे**

१२. वार्षिक तपासणी करिता वेळावेळी अद्यावत होणा-या प्रपत्रांचा संच प्रत्येक नगरपरिषदेने मागील आर्थिक वर्षाच्या कामकाजावरुन दरवर्षी ३१ मे पर्यंत पूर्णपणे तयार करुन ठेवावे. नगरपरिषदेच्या पूर्व नियोजित तपासणी कार्यक्रमानुसार तपासणी आर्थिक वर्षात केंव्हाही हाती घेण्यात येणार असली तरी ही त्यांनी हा संपूर्ण संच ३१ मे पर्यंत तयार करुन ठेवावा आणि तपासणी प्राधिका-यांचा तपासणी कार्यक्रम प्राप्त होताच तो संबंधित तपासणी प्राधिका-याकडे सादर करावा. या प्रपत्र संचामधील माहितीची नगरपषिद अभिलेखावरुन तपासणी पथकाने तपासणीच्या वेळी पडताळणी करावी.

**तपासणीतील परिच्छेदांच्या पुर्ततेकरिता पाठपुरावा**

१३. प्रत्येक पर्यवेक्षीय प्राधिका-याने तपासणी अहवालातील परिच्छेदांच्या पुर्ततेकरिता संबंधित नगरपरिषदेकडे पाठपुरावा करावा. विशेष तपासणीत आढळून आलेल्या गंभीर त्रुटी, अनियमितता, गैरप्रकार किंवा आर्थिक बाबींबद्दल कार्यवाही अपेक्षित असलेल्या परिच्छेदांकरिता तपासणी प्राधिका-याने व्यक्तिशः लक्ष द्यावे.

१४.	पूर्वीच्या प्रलंबित तपासणी परिच्छेदांची पुर्तता तपासणी पथके स्वीकृत करतील. पूर्व नियोजित तपासणीच्या वेळी त्यांच्याकडे प्रलंबित असलेल्या परिच्छेदांची छाननी करुन घेतील आणि मान्य करण्याजोगी आढळून आल्यास औपचारिकरित्या स्वीकृत करतील व अशा स्वरुपचा उल्लेख नवीन तपासणी अहवालात प्रथम करतील.

१५.	पूर्व नियोजित तसेच अचानक तपासणीचा संपूर्ण अहवाल नगरपरिषदेचे अध्यक्ष व मुख्याधिकारी यांनी तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर प्रथम होणा-या सर्वसाधारण सभेपुढे सादर करावा. अशाप्रकारे तपासणी अहवाल सादर झाला होता किंवा नाही याची पडताळणी त्या पुढील तपासणीच्या वेळी संबंधित प्राधिका-यांनी करावी.

तपासणी अहवालातील परिच्छेदांची पुर्तता करण्याचा कालावधी

१६.	प्रत्येक पूर्व नियोजित आणि अचानक तपासणी अंती तयार झालेल्या अहवालाच्या अनुषंगाने पुर्तता अहवाल परंतु सर्व परिच्छेदांची पुर्तता करणे शक्य नसल्यस त्याच्या पुर्ततेकरीता किमान कृती आराखडा नगरपषिद मुख्याधिकारी यांनी तपासणी अहवाल प्राप्त झाल्यापासून ६० दिवसाच्या आत संबंधित प्राधिका-याकडे सादर करण्याची दक्षता घ्यावी.

( भगवान सहाय )
संचालक,
नगरपरिषद प्रशासन संचालनालय.